॥ हिरव्या हिरव्या रंगाची ॥

हिरव्या हिरव्या रंगाची झाडी घनदाट
सांग गो चडवा दिसतां कसो खंडाळ्याचो घाट ॥ धृ. ॥

हिरव्या हिरव्या झाडीत हिरवी हिरवी पानं,
हिरव्या हिरव्या पानांत वारा गातो गाणं।
पूना - बॉंबे हीच गो तुझ्या, सासरची वाट ॥ १ ॥
खंडाळ्याच्या घाटात हवा थंडगार,
थंडीमधे लाली चढे गाली गुलजार।
तोर्यामधे होऊ नको, उगी अशी ताठ ॥ २ ॥

बोगद्यात गाडी जाता होई अंधार,
अंधारात प्रीत घेता प्रीतीचो आधार।
रागामध्ये रूप तुझे। दिसतय गो बेफात ॥ ३ ॥

झटक फटक झटक फटक गाडीचो आवाज,
गाडीच्या या आवाजाला इंजिन देई साद।
इंजिनाच्या मागे जाती, डबे मागोमाग ॥ ४ ॥